# प्रेम धवन - भाग २



प्रश्न - आता जरा मला तुमच्याबद्दल सुरुवातीपासूनची माहिती द्याल का ?

प्रेम धवन - १३ जून १९२३ रोजी अंबाला येथे माझा जन्म झाला. माझे वडील जेल सुपरिंटेन्डन्ट म्हणजेच जेलर होते. ब्रिटिशांच्या वेळी ही सरकारी नोकरी होती. तसेच काही थोड्या वर्षांनी वडिलांची बदलीही होत असे. मी लाहोरच्या एफ. सी. कॉलेजमधून पदवीधर झालो. साहिर लुधियानवी हेही ह्याच कॉलेजात माझ्याच वर्गात होते. इथेच इन्दरकुमार गुजराल हे आमच्या पुढे दोन वर्षे होते आणि ते कॉलेजच्या विद्यार्थी संघटनेचे लीडर होते. साहीर व मी युनियनचे सक्रीय कार्यकर्ते होतो. ह्या दिवसांत आमच्यावर चम्युनिस्ट विचारसरणीचा पगडा होता. १९४२ च्या सुमारास आम्ही दोघेही कॉलेजच्या मासिकात थोडेफार लिहीतही असू. त्यांनी खूप गझला लिहिल्या तर मी गीते ! १९४३ मध्ये मी इकॉनॉमिक्स, पॉलिटिकल सायन्स आणि पर्शियन घेऊन पदवीधर झालो आणि लगेचच काँग्रेस पार्टीत गेलो आणि त्यांचा पूर्ण वेळ कार्यकर्ता बनलो. पक्षाचा 'पीपल्स थिएटर ग्रुप' नावाचा एक मनोरंजनाचा कार्यक्रम विभाग मुंबईमध्ये होता. तिथे मला पाठवण्यात आले. तेथे माझ्यासारखी बरीच मंडळी होती आणि अंधेरी येथे आमच्या रहाण्याची व्यवस्था केली होती. रहाणे, जेवणखाणे आणि महिना रु. ४० एवढा पगार आम्हाला मिळत असे. आमच्यासोबत रवि शंकर व सचिन आणि उदय शंकर देखील होते. आम्ही तेथे संगीत आणि नाच देखील शिकलो. हे सर्व चार वर्षे चालू होते.

प्रश्न - तुम्ही नाचसुध्दा शिकला ?

प्रेम धवन - हो. एवढेच नव्हे तर जवळजवळ ५० चित्रपटांतून मी नृत्य दिग्दर्शनही केले. त्यांपैकी काही म्हणजे 'नया दौर' ('उडे जब जब जुल्फे तेरी' हे नृत्य तुमच्या लक्षात असेलच), 'गूँज उठी शहनाई',

'आरझू' (दिलीप कुमार व कामिनी कौशल यांचा), 'दो बिघा जमीन' ('हरियाला सावन ढोल बजाता आया' - मी ह्या चित्रपटातील नृत्यात भागही घेतला होता), इ.

१९४७ सालच्या दंगलीनंतर 'पीपल्स थिएटर ग्रुप' बंद झाला. यानंतर शाहिद लतिफ आणि इस्मत चुगताई हे दोघे मला अशोक कुमार आणि देविकाराणी यांना भेटण्यासाठी बॉम्बे टॉकीजमध्ये घेऊन गेले. येथे त्यांनी मला 'जिद्दी' या चित्रपटामध्ये प्रथम संधी दिली. खेमचद प्रकाश त्याचे संगीत दिग्दर्शक होते. त्यातले 'चंदा रे जा रे जा' हे लताने गायलेले पहिले लोकप्रिय गाणे. ह्या चित्रपटात मी नृत्य दिग्दर्शन केले होते. ह्या चित्रपटाची सिल्व्हर ज्युबिली दणक्यात साजरी झाली.

त्यानंतर गुलाम हैदर यांचे संगीत असलेला 'मजबूर' हा चित्रपट आला आणि ह्याचेही नृत्य दिग्दर्शन मीच केले होते. बॉम्बे टॉकीजने अभिनयासाठी जसा दिलीपकुमार यांच्याबरोबर करार केला होता तसाच करार माझ्याबरोबर गीतलेखन आणि नृत्य दिग्दर्शन यांसाठी केला होता. काम असो वा नसो, आम्हाला दररोज बॉम्बे टॉकीजमध्ये जावे लागत असे. माझे कॉन्ट्रॅक्ट संपल्यावर मी स्वतंत्रपणे काम करण्यास सुरुवात केली. आता उत्तमोत्तम काम आणि भरपूर पैसे येऊ लागले. अनिल विश्वास, सलील चौधरी, मदन मोहन, चित्रगुप्त आणखी बऱ्याच जणांबरोबर काम करण्याची संधी मिळू लागली.

प्रश्न - 'पीपल्स थिएटर' आणि 'प्रोग्रेसिव्ह रायटर्स असोसिएशन' यांचे काही परस्पर संबंध होते का ?

प्रेम धवन - नाही, परंतु दोघांचीही क्म्युनिस्ट धार्जिणी विचारप्रणाली होती. जोश मलिहाबादी आणि इतर अनेकांसह मी इथेही सभासद म्हणून होतो.

प्रश्न - त्यानंतर तुम्ही अनिल विश्वास सोबत 'तराणा' चित्रपट केला. तुमचे आणि त्यांचे विचार चांगल्या प्रकारे जुळत होते का ? त्यांच्यासोबत अप्रतिम गाणी तयार झाली का ?

प्रेम धवन - हो, आणि सलील चौधरींसोबत सुध्दा माझे संबंध चांगले होते. अनिलदांनाही तसेच वाटत असे. एकदा ते आणि मी मोटरमधून फिरायला गेलो होतो. तुम्हाला गायिका सुरिंदर कौर आठवते का ? तिचा नवरा माझा चांगलाच मित्र होता आणि तेव्हा तो मुंबईला आला होता. मला त्याला थोड्या वेळासाठी भेटायचे होते. मी अनिलदांना म्हटले की तुम्ही वरळी सी फेसवरून गाडी घ्याल का ? ते म्हणाले येईन पण मी मात्र गाडीतच बसून राहीन. पुढे त्यांनी मला विचारले की मी त्यांच्यासाठी काही गाणी वगैरे लिहिलीत का ? मी त्यांना माझ्या नवीन गाण्याच्या पहिल्या दोन ओळी दिल्या आणि मी माझ्या मित्राला भेटायला गेलो. मी परत आलो तर त्यांनी त्या ओळींना सुंदर चाल दिली होती. ते गाणे होते, 'सीनेमे सुलगते है अरमान' आणि त्या गाण्याला रसिकांची प्रचंड दाद मिळाली. अशा

रितीने मी त्यांच्या बरोबरीने 'तराना', 'आरझू', 'आराम', 'परदेसी', 'राही', 'आकाश', 'नाझ' इ. अनेक चित्रपट केले.

(क्रमश:)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून.)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com